# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

**दूरध्वनी क्र.** (०२२) २२१६ ३९६४ / ६५ / ६९, **फॅक्स क्र.** : (०२२) २२१६ ३९७६

**ई-मेल** : mercindia@merc.gov.in **संकेतस्थळ** : www.mercindia.org.in / www.merc.gov.in


**सन २०१४ चे प्रकरण क्र. ६०**

जाहिरात क्र. : १०/२०१४-१५

# जाहीर सूचना

## विदर्भ इंडस्ट्रिज पॉवर लिमिटेड यांचा विद्युत पारेषण परवान्यासाठी अर्ज

१. **मे. विदर्भ इंडस्ट्रिज पॉवर (व्हीआयपीएल)** यांनी महाराष्ट्रातील नागपूर येथील बुटीबोरी येथे ६०० मे. वॉ.चा प्रकल्प बांधला आहे. व्हीआयपीएल यांनी प्रकल्प कार्यान्वित करताना राज्य पारेषण कंपनी म्हणजेच महापारेषण कंपनीला विजेच्या वहनासाठी आणि वीज वहन व्यवस्थेच्या बांधकामासाठी ग्रीडमध्ये पुरेशी जोडणी देण्याची विनंती केली होती.

२. त्यानंतर महापारेषण कंपनीने ग्रीडला जोडणी देण्याची विनंती स्वीकारली आणि व्हीआयपीएल यांना खालील योजनांचा अंतर्भाव असणारी आंतरजोडणी पारेषण व्यवस्था त्यांच्या पर्यवेक्षण आणि संनियंत्रणाखाली उभारण्याचे निर्देश दिले.

| योजना क्र. | योजनेचा तपशील | जिल्हा |
|---|---|---|
| योजना १ | (१) २२० के. व्ही. डबल सर्किट पारेषण वाहिनी (१.२ कि. मी.) - व्हीआयपीएल विद्युत प्रकल्प स्वीचयार्ड ते महापारेषण बुटीबोरी उपकेंद्र-३.<br>(२) २२० केव्ही महापारेषण बुटीबोरी उपकेंद्र-३ येथे - दोन २२० केव्ही बेज. | नागपूर, महाराष्ट्र |
| योजना २ | (१) २२० के. व्ही. डबल सर्किट पारेषण वाहिनी (१.८६ कि. मी.) - व्हीआयपीएल विद्युत प्रकल्प स्वीचयार्ड ते महापारेषण बुटीबोरी उपकेंद्र-१.<br>(२) २२० केव्ही महापारेषण बुटीबोरी उपकेंद्र-१ येथे - दोन २२० केव्ही जीआयएस बेज. | |

३. आयोगाच्या सन २०१३ च्या प्रकरण क्र. २ मधील आदेशाच्या संदर्भात, आयोगाने व्हीआयपीएल यांना आर-इन्फ्राबरोबरच्या त्यांच्या वीज खरेदी करारातील आंतरजोडणीचे ठिकाण आणि वीज केंद्र या शब्दांच्या व्याख्येत फेर-फार करण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानंतर व्हीआयपीएल यांनी त्यांच्या निर्मिती केंद्रातून विजेचे वहन करण्याकरिता वहन व्यवस्था उभारण्यासाठी पारेषण परवान्याकरिता मंजुरी मागणे आवश्यक आहे.

४. वरील बाबींच्या संदर्भात, व्हीआयपीएल यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४सह कलम १५ अंतर्गत पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी दि. **२० फेब्रुवारी, २०१४** रोजी अर्ज केला आहे.

५. व्हीआयपीएल यांचे नोंदणीकृत कार्यालय एच-ब्लॉक, पहिला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई-४०० ७१०, महाराष्ट्र, येथे आहे.

६. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (२) नुसार, व्हीआयपीएल यांनी **'द इंडियन एक्स्प्रेस', 'हिंदुस्थान टाईम्स', 'लोकसत्ता'** आणि **'सामना'** या वृत्तपत्रांच्या स्थानिक आवृत्त्यांमध्ये दि. **२३ मे, २०१४** रोजी अर्जाची नोटीस प्रसिद्ध केली आहे.

७. वर्तमानपत्रांतील व्हीआयपीएलच्या अर्जाच्या नोटिसीच्या संदर्भात, जनतेकडून कोणत्याही सूचना किंवा हरकती प्राप्त झाल्या नाहीत. त्याशिवाय, राज्य पारेषण कंपनीने त्यांच्या **दि. ३० जून, २०१४** च्या पत्राने, मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनिमय, २००४ च्या भाग-२-सर्वसाधारण अटी व शर्तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पर्याय-२ नुसार व्हीआयपीएल यांना पारेषण परवाना मंजूर करण्याची शिफारस केली आहे. आयोगाकडे उपलब्ध असलेली माहिती विचारात घेऊन, आयोगाची खात्री झाली आहे की, व्हीआयपीएल सकृतदर्शनी प्रस्तावित पारेषण क्षेत्राकरिता पारेषण परवाना मंजुरीसाठी पात्र आहे.

८. वरील बाबी विचारात घेऊन, आयोग, सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार, अधिनियम आणि विनियमातील सर्व आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून व्हीआयपीएल यांना वरील परिच्छेद २ मध्ये संदर्भ केलेल्या योजनांकरिता पर्याय-२ अंतर्गत पारेषण परवानाधारक म्हणून परवाना देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

९. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) अंतर्गत आयोगाने अर्जदाराला पारेषण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावासंबंधी सूचना आणि / किंवा हरकती असल्यास त्या मागविण्यासाठी ही नोटीस देण्यात येत आहे. या सूचना आणि / किंवा हरकती खाली सही करणाऱ्याला **दि. ३ डिसेंबर २०१४** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने वर नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवाव्यात. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना आणि / किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१०. व्हीआयपीएलने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबत जोडपत्रांसह आयोगाच्या **www.merc.gov.in / www.mercindia.org.in** या संकेतस्थळांवर किंवा कोणत्याही व्यक्तीला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

११. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या सूचना / हरकती, असल्यास, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, (६ + १) प्रतींमध्ये, त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेल आयडी, असल्यास, त्यासह पाठवाव्यात. सूचना / हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. तसेच सूचना किंवा हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीला त्याचे म्हणणे आयोगासमोर व्यक्तीशः मांडावयाचे असल्यास तसेदेखील त्यात नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला आयोगातर्फे **दि. ९ डिसेंबर, २०१४** रोजी **सकाळी ११.३० वाजता**, आयोगाच्या **१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक : १२.११.२०१४

ठिकाण : मुंबई

स्वाक्षरी/-

**सचिव**, मविनिआ